नियमीत दावा क्र. ६२/२०२२
सुमन..विरुध्द ..मुरलीधर

## निशाणी क्रमांक १२ वरील आदेश

१. प्रस्तुत दावा कायमचा मनाई हुकूम व नुकसान भरपाई मिळणेबाबत दाखल केलेला असुन त्यामधील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी लेखी जबाब दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला व सदर अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व म्हणणे पाहिले . वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचे म्हणणे ऐकले .

४. प्रस्तुत दाव्याचा अभिलेख तपासले असता असे दिसुन येत आहे की, प्रतिवादी यांना दि. १३.१०.२०२२ रोजी दाव्याचे समन्स मिळाले असुन ते दि.१५.१२.२०२२ रोजी न्यायालयासमोर हजर झालेले आहेत. त्यानंतर प्रतिवादी तर्फे लेखी जबाब दाखल करण्यासाठी वेळ मिळणेबाबत अर्ज दाखल करण्यात आले होते व ते अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ८ नियम१ ला अधिन राहुन मंजुर करण्यात आले होते.

५. प्र.वा.क्र. १ ते ३ यांनी दि. २४.०१.२०२३ रोजी प्रस्तुत अर्जासह त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येत आहे की, प्रतिवादी यांना कायदेशीर कालावधी व्यक्तीरीक्त काही दिवसांचा विलंब झालेला आहे परंतु असे जरी असले तरी प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वानुसार अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे पुढील आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी रक्कम रु. २०० विलंब खर्चास अधिन राहुन देण्यात येत आहे.

३. संबंधीत पक्षकारांनी नोंद घ्यावी.

दि. ०८/०३/२०२२

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2023.03.09 10:50:15 +0530

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), बाळापुर.
बाळापुर.

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same words as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Jt. C.J.J.D., Balapur |
| Name of Stenographer | : | Shri. Shaikh Rafique |
| Date of Judgment | : | 08/03/2023. |
| Order Signed by P.O. on | : | 08/03/2023. |
| Order uploaded on | : | 09/03/2023. |